**राज्यातील महानगरपालिका/ नगरपरिषदा / नगरपंचायतींमधील पात्र अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या वारसास अनुकंपा नियुक्ती योजनेसंदर्भातील सुधारित शासन निर्णय लागू करणेबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्र.एमसीओ-२०१९/प्र.क्र.११७/नवि-१४**
मंत्रालय (मुख्य इमारत), ४ था मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२
दि. ११ जुलै, २०१९

<u>**संदर्भ**</u> :- १. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.एमसीओ-१२१६/१८८९/प्र.क्र.११५/९६/नवि-१४, दि.१६.१०.१९९७.

२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.अकंपा-१२१७/प्र.क्र.१०२/आठ, दि.२१.०९.२०१७.

३. नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे क्र.नपप्रसं/सर्व-नप/शा.नि.परि./अनुकंपा-निश्चिती/२०१७/का-७, दि.२०.१०.२०१८ चा प्रस्ताव.

<u>**प्रस्तावना**</u>:-

शासन सेवेत कार्यरत असताना मृत पावलेल्या / दिवंगत झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या वारसांना शासनसेवेत नियुक्ती देण्यासाठी अनुकंपा नियुक्तीबाबतच्या सर्व शासन निर्णय/ परिपत्रके यांचे एकत्रिकरण करुन, सामान्य प्रशासन विभागाने शासन निर्णय क्र.अकंपा-१२१७/प्र.क्र.१०२/आठ, दिनांक २१.०९.२०१७ अन्वये सर्व समावेशन शासन निर्णय निर्गमित केला आहे.

सदर शासन निर्णयातील तरतूदी या केवळ शासन कर्मचाऱ्यांपुरतेच सिमीत आहेत. सदर तरतुदी या जिल्हापरिषदा/ नगरपरिषदा/ महानगरपालिका/ महामंडळे/ प्राधिकरणे/ व्यापारी उपक्रम इत्यादी तत्सम आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना थेट लागू होणार नाही. त्यासाठी संबंधित प्रशासकीय विभागाने स्वतंत्रपणे निर्णय घेणे आवश्यक राहील असे या शासन निर्णयात नमूद केले आहे. त्यानुषंगाने, संचालनालयाने संदर्भ क्र.३ अन्वये सादर केलेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे: -

**शासन निर्णय: -**

सामान्य प्रशासन विभागाने शासन निर्णय दि.२६.१०.१९९४ अन्वये विहीत केलेली अनुकंपा नियुक्ती योजना संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णय दि.१६.१०.१९९७ अन्वये कोणतेही नवीन पद निर्माण पद करण्याच्या अटीवर नगरपरिषद/ नगरपंचायतींना लागू आहे.

२. आता, सामान्य प्रशासन विभागाचा अनुकंपा नियुक्ती योजनेबाबतचा सर्वसमावेशक सूचनांचे एकत्रिकरण असलेला शासन निर्णय दि.२१.०९.२०१७ राज्यातील महानगरपालिका(बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून)/ नगरपरिषदा/ नगरपंचायतींना खालील फेरफारासह/ सुधारणांसह लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे: -

**(अ)** अनुकंपा नियुक्ती योजनेचा लाभ नगरपरिषद/ नगरपंचायतींमधील खालील प्रकारच्या कर्मचाऱ्यांच्या पात्र कुटुंबियांना लागू राहील: -

१. नगरपरिषद / नगरपंचायतीतील आस्थापनेवर काम करणारे स्थायी / अस्थायी कर्मचारी.

२. ज्या कर्मचाऱ्यांची नगरपरिषद/ नगरपंचायत सेवेत गट-क किंवा गट-ड मध्ये विहीतरित्या नियुक्ती करण्यात आलेली आहे व ते नगरपरिषद/ नगरपंचायतीच्या आस्थापना सूचीवर आहेत.

३. जे कर्मचारी नगरपरिषद / नगरपंचायत सेवेत रोजंदारीने दि.२७.०३.२००० पूर्वी कार्यरत होते व त्यांना शासन/ नगरपरिषद प्रशासन संचालनालय/ विभागीय आयुक्त यांच्याकडील आदेशाने सेवेत सामावून घेवून नियुक्ती देण्यांत आली आहे, असे कर्मचारी.

४. ज्या रोजंदारी कर्मचाऱ्यांबाबत मा.कामगार न्यायालय/ मा.औद्योगिक न्यायालय/ मा.उच्च न्यायालय/ मा.सर्वोच्च न्यायालय यांचे आदेशाने त्यांना नगरपरिषद/ नगरपंचायत सेवेत कायम करण्याचे आदेश दिले असतील व त्याप्रमाणे शासन/ नगरपरिषद प्रशासन संचालनालय/ विभागीय आयुक्त यांनी पदनिर्मितीस/ त्यांना सामावून घेण्यास मान्यता दिली असेल असे कर्मचारी,

५. नगरपरिषद / नगरपंचायती सेवेत नियमित केलेले परंतू अधिसंख्य पदावर कार्यरत असलेले कर्मचारी,

**(ब)** अनुकंपा तत्वावर प्रतिक्षासूची ठेवण्याबाबतची कार्यवाही:-

१. संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाने त्या जिल्ह्यातील नगरपरिषदा/ नगरपंचायतींमधील कर्मचाऱ्यांच्या पात्र वारसास या योजनेतंर्गत नियुक्ती देण्यासाठी गट-क व गट-ड करीता स्वतंत्र प्रतिक्षासूची ठेवावी.

२. संबंधित मुख्याधिकाऱ्यांनी दिवंगत कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांना / पाल्याना योजनेची माहिती देऊन, नियमावलीतील नियमानुसार प्रस्ताव प्राप्त करुन घेऊन, परिपूर्ण प्रस्ताव नगरपरिषद प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याकडे पाठवावा.

३. जिल्हा प्रशासन अधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने संबंधित पात्र वारसाचे नाव प्रतिक्षायादीत समाविष्ट करावे.

**(क)** अनुकंपा नियुक्ती योजनेचा लाभ महानगरपालिकेच्या खालील कर्मचाऱ्यांना लागू राहील: -

१. महानगरपालिकेच्या रुपांतरीत स्थायी व अस्थायी आस्थापनेवरील महानगरपालिका कर्मचारी.

२. सेवा नियमित केलेल्या परंतु, अधिसंख्य पदावर कार्यरत असलेले महानगरपालिका कर्मचारी.

**(ड)** महानगरपालिकांमध्ये अनुकंपा नियुक्तीसाठी शैक्षणिक अर्हता: -

१. गट-क व गट-ड मधील सरळसेवेच्या पदांवर संबंधित सेवाप्रवेश नियमांतील विहीत शैक्षणिक अर्हता असल्यास, अशी नियुक्ती देता येईल.

२. तसेच, जेथे महानगरपालिकाचे स्वत:चे सेवा प्रवेश नियम विहीत नाहीत अशा प्रकरणी शासनाकडील समकक्ष पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार विहीत शैक्षणिक अर्हता असणे आवश्यक आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१९०७१११५०५४२६८२५** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjay S Gokhale

Digitally signed by Sanjay S Gokhale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Urban Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ab8a7eeedad158d24cf530f0d6b662808245be49a8459ed4c63961ebdc3cb961, cn=Sanjay S Gokhale
Date: 2019.07.11 15:15:58 +05'30'

**(सं.श.गोखले)**
**सह सचिव**

**प्रति,**

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे अ.मु.स., मंत्रालय, मुंबई.
२. मा.विरोधी पक्षनेते, दोन्ही सभागृह, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
३. सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.राज्यमंत्री (नवि) महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई.
६. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक (सर्व).
७. जिल्हाधिकारी (सर्व).
८. सर्व महानगरपालिका/ नगरपरिषदा / नगरपंचायती यांचे मुख्याधिकारी.
९. निवडनस्ती (नवि-१४)